# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा परिषद व खाजगी संस्थाच्या अनेक शाळामध्ये अग्नीशामक यंत्रे नसल्याबाबत**

**(१) १२९६६ (०८-०४-२०१५). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा परिषद व खाजगी संस्थाच्या अनेक शाळामध्ये अग्नीशामक यंत्रे नसल्यामुळे आग लागण्याची घटना घडल्यास गंभीर धोका उद्भवू शकतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांमध्ये अग्नीशामक यंत्रे वा अग्नीरोधक यंत्रणा कार्यान्वीत नसण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) सदर शाळामध्ये अग्नीशामक यंत्रे व अग्नीरोधक यंत्रणा कार्यान्वीत करण्याबाबत शासनाकडून काय कार्यवाही करण्यात येईल ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१६) :** (१), (२) व (३) जिल्हा परिषद हिंगोली अंतर्गत ८१० शाळांना अग्निशमन यंत्रे पुरविण्यात आलेली आहेत.

---

**मुंबई विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील नॅक चा 'अ' दर्जा असलेल्या महाविद्यालयांना स्वायत दर्जा देण्याबाबत**

**(२) १५५४५ (०९-०४-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाकडून त्यांच्या कार्यकक्षेतील नॅक चा 'अ' दर्जा असलेल्या महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा देण्यात अनावश्यक घाई करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियम, अटी आणि शर्ती तसेच मार्गदर्शक तत्वे यांचे महाविद्यालयांनी काटेकोर पालन केल्याबद्दल शहानिशा किंवा प्रत्यक्षदर्शी खात्री करुन तसे अहवाल जतन करून ठेवण्यासह प्रत्यक्ष महाविद्यालयात असलेल्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि पायाभूत सुविधा यांची पडताळणी केली आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी घाई करणाऱ्या मुंबई विद्यापीठावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०९-२०१६) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३), (४) व (५) होय, विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयांना स्वायत्ता देणेबाबत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार विद्यापीठाने तयार केलेल्या परिनियमाप्रमाणे स्थानिक चौकशी समिती मार्फत महाविद्यालयात असलेल्या शैक्षणिक प्रशासकीय आणि पायाभूत सुविधा यांची पडताळणी करुन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिलेल्या मान्यतेनंतर विद्यापीठ स्तरावर महाविद्यालयांना स्वायत्तता देण्यात येते.

---

**विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय व जिल्हा रुग्णालय नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक येथे पी.जी.इन्स्टिट्युट सुरु करणेबाबत**

**(३) १८२६२ (१७-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय व जिल्हा रुग्णालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक येथे पी.जी.इन्स्टिट्युट सुरु करणेसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने दिनांक २५ एप्रिल, २०१० रोजी शासनास प्रस्ताव सादर करुनही माहे जानेवारी, २०१५ पर्यंत शासनाने आवश्यकता प्रमाणपत्र वितरीत केले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पी.जी.इन्स्टिट्युट सुरु करणेसाठी आवश्यकता प्रमाणपत्र निर्गमित करण्याची लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पुढे कोणती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०८-२०१६) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.
(२) होय, हे अंशतः खरे आहे. पी.जी. इन्स्टिटयूट स्थापन करण्याची मागणी केली आहे.

(३) विद्यापीठाकडून प्रथम विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक येथे पी.जी. इन्स्टिटयूट स्थापन करण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. तद्नंतर महापालिका रुग्णालय, नाशिक यांचेशी संलग्नित पी.जी. इन्स्टिटयूट स्थापन करण्याचा प्रस्ताव विचारात घेणे आवश्यक असल्याने त्यानुषंगाने तपासणी करुन शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शैक्षणिक कार्यासाठी शासनाने मुंबई विद्यापीठाला कलिना कॅम्पसमध्ये दिलेला भूखंड विविध खाजगी संस्थांना शैक्षणिक कार्यासाठी दिल्याबाबत**

**(४) १९४५१ (३१-०७-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने शैक्षणिक कार्यासाठी मुंबई विद्यापीठाला कलिना कॅम्पसमध्ये दिलेल्या भूखंडापैकी कित्येक एकर भूखंड विविध खाजगी संस्थांना शैक्षणिक कार्यासाठी दिलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी संस्था सदर जागेचा वापर व्यावसायिक कामाकरीता करत असल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याबाबतच्या सुविधांचा लाभ विद्यापीठातील विद्यार्थी व प्राध्यापकांना देण्यात येत नसल्याच्या तक्रारी प्रशासनाला प्राप्त झालेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०९-२०१६) :** (१) होय, ऑल इंडिया टेनिस असोसिएशन या संस्थेला ७ एकर भूखंड सामंज्यस्य करारानुसार देण्यात आलेला आहे.
(२) होय,
(३) होय,
(४) या संदर्भात विद्यापीठाकडून खूलासा मागविण्यात आलेला आहे.
(५) पश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाने अवाजवी शैक्षणिक शुल्क आकारणा-या शिक्षण संस्थांवर नियंत्रण ठेवण्याबाबत घेतलेला निर्णय**

**(५) २८२८६ (१७-११-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अवाजवी देणगी व मनमानी शैक्षणिक शुल्क आकारुन विद्यार्थ्यांची लूट करणा-या खाजगी शिक्षण संस्थांच्या मनमानीला आळा घालण्याचा निर्णय शासनाने दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजीच्या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) उक्त निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे वा येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०८-२०१६) :** (१) होय.
(२) राज्यातील मान्यताप्रप्त व्यावसायिक आभ्यासक्रमांच्या खाजगी विनाअनुदानित शिक्षण स्ंस्थांतील प्रवेश व शुल्क नियमन करण्यासाठी दिनांक १२ मे, २०१५ रोजी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश शुल्क यांचे विनियमन) अध्यादेश, २०१५ प्रस्थापित करण्यात आला. तद्नंतर सदर अध्यादेश "महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायीक शिक्षण संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५" दिनांक १७ ऑगष्ट, २०१५ रोजी " सन २०१५ चा महाराष्ट अधिनियम क्र. २८" असा महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला आहे. सदर अधिनियमान्वये राज्यातील खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांतील प्रवेशांचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी उच्च न्यायालयाचा सेवानिवृत्त न्यायाधीश किंवा शासनाच्या मुख्य सचिव दर्जाच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली अनुक्रमे प्रवेश नियामक प्राधिकरण व शुल्क नियामक प्राधिकरण अशी दोन प्राधिकरणे तसेच व्यवसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा कक्ष निर्माण करण्यात आला आहे.
(३) अधिनियमाच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक १७ ऑगष्ट, २०१५ पासून सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील युनानी आयुर्वेदिक वैद्यकिय महाविद्यालयाच्या आस्थापनांना प्रदेय असलेले अनुदान संबंधित विभागांमार्फत प्रत्यार्पित करण्याबाबत

**(६) २९१४८ (२२-१२-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील युनानी आयुर्वेदिक वैद्यकिय महाविद्यालयाच्या आस्थापनांना देय असलेले सन २०१३-१४ आणि २०१४-१५ या कालावधीचे अनुदान संबंधित विभागांमार्फत प्रत्यार्पित करण्याबाबतची मागणी जनप्रतिनिधी, संबंधित महाविद्यालयाच्या परीक्षेत्रातील वैद्यक व्यवसायी स्नातक व स्नातकोत्तर विद्यार्थी आणि त्यांचे पालकवर्ग यांनी मा. मंत्री आरोग्य व कुटुंब कल्याण, मा. राज्यमंत्री आरोग्य व कुटुंब कल्याण, प्रधान सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण, महासंचालक, आरोग्य व कुटुंब कल्याण, आणि संबंधित महाविद्यालयांचे प्रशासन मंडळ यांच्याकडे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा करणेत येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०८-२०१६) :** (१) अशा आशयाचे निवेदन आढळून आले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे येथे उत्तर महाराष्ट्र विदयापीठाचे उपकेंद्र सुरु करण्याबाबत

**(७) २९४३६ (१५-०१-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उत्तर महाराष्ट्र विदयापीठाचे उपकेंद्र जागा आरक्षणात अडकल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे,
(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती उक्त उपकेंद्र धुळे येथे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) दि. २८/०४/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रा. डॉ. योगानंद काळे यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या समितीने उपकेंद्रासाठी निश्चित धोरण तयार करण्याकरता अंतिम अहवाल दि. २३/०२/२०१६ रोजी शासनास सादर केला.
(४) प्रा. डॉ. योगानंद काळे यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या अहवालातील धोरणाच्या शिफारशींना मान्यता घेण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.

---

### राज्यातील काही अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांची शुल्क आकारणी होत असल्याबाबत

**(८) ३०१४६ (२०-०१-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकिय व अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांचे शुल्क व नियम शासनाने दि. १ मार्च, २०११ मध्ये ठरवून दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील काही अनुदानित महाविद्यालयांमध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शुल्क हे शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून विद्यार्थ्यांकडून वसूल केले जात असल्याची बाब वैद्यकीय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांकडे विद्यार्थ्यांनी सहा महिन्यांपूर्वी निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संस्था चालकांनी विद्यार्थ्यांकडून घेतलेले शुल्क परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नियमबाहय शुल्क वसुली करण्यात येऊ नये, याबाबत संचालक, आयुष यांचेमार्फत अनुदानित महाविद्यालयांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, आयुर्वेद पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या शुल्काबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे प्रकरण न्यायप्रविष्ठ असून सुनावणीपर्यंत महाविद्यालयाविरुध्द कोणतीही कृती करण्यापासून मा.न्यायालयाने प्रतिबंध केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विविध क्रिडा स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी शालेय संघ व मुला-मुलींना आकारण्यात येणारी वाढीव प्रवेश फी कमी करणेबाबत**

**(९) ३०८०२ (२२-१२-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या क्रिडा व युवक सेवा संचालनालयामार्फत घेण्यात येणा-या विविध क्रिडा स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी शालेय संघ व मुला-मुलींना आकारण्यात येणारी वाढीव प्रवेश फी कमी करावी अशी मागणी सिंधुदुर्ग जिल्हा क्रिडा व शारीरीक शिक्षण शिक्षक महासंघाने जिल्हा क्रिडाधिका-यांकडे केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०९-२०१६) :** (१) होय.
(२) क्रीडा व युवक सेवा संचालानालयामार्फत घेण्यात येणाऱ्या विविध क्रिडा स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी प्रवेश शुल्कामध्ये वाढ करण्याबाबतची कारणमिमांसा संबंधितांना स्पष्ट करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सदर प्रवेश शुल्क कमी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपुर पंचायत समिती क्षेत्रातील विद्यार्थी पुस्तकापासून वंचित असल्याबाबत**

**(१०) ३३०५५ (२१-०१-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपुर पंचायत समिती क्षेत्रातील सुमारे ८०० विद्यार्थी माहे ऑगस्ट २०१५ अखेर पुस्तकापासून वंचित असल्याचे उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुषंगाने विद्यार्थ्यांना पुस्तके देण्यास विलंब करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयातील कन्नड तालुक्यात शाळांना पुरवठा करण्यासाठी आणलेली ३२ अग्निशमन यंत्रके वाटपाविना गोदामात पडून असल्याबाबत**

**(११) ३३१७७ (२१-०१-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील कन्नड तालुक्यातील शाळांना पुरवठा करण्यासाठी आणलेली ३२ अग्निशमन यंत्रे वाटपाविना गोदामात पडून असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या केंद्र प्रमुखांनी अग्निशमन यंत्रे वितरीत केले नाही त्यांच्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही. दिनांक ७/३/२०१५ रोजी पंचायत समिती कन्नड, जि. औरगांबाद यांना ८९ अग्निशमन यंत्राचा पुरवठा करण्यात आला केंद्र प्रमुखांमार्फत संबंधित शाळांना दिनांक १/४/२०१५ पर्यत अग्निशमन यंत्राचे वाटप करण्यात आले.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील सार्वजनिक वाचनालये शासनाच्या नियमाला बाजूला ठेऊन केवळ अनुदानासाठी सुरु असल्याबाबत**

**(१२) ३३३६० (२१-०१-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील सार्वजनिक वाचनालये शासनाच्या नियमाला बाजूला ठेऊन केवळ अनुदानासाठी सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात ९५० वाचनालये असून ती सर्व अनुदान घेत असून यापैकी अनेक वाचनालये बंद आहेत तर काही वाचनालये आणि घर एकत्रित आहेत काही वाचनालयात वर्तमानपत्रेच आणली जात नाही किंवा ती उघडलीही जात नाहीत यामुळे वाचकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-०९-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) अंशतः खरे आहे. सन.२०१५-२०१६ मध्ये जिल्हा ग्रंथालय अधिकारी, सोलापूर कार्यालयाकडून करण्यात आलेल्या तपासणीवेळी सोलापूर जिल्हयातील ९५० शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांपैकी सेवा देत नसलेल्या १२१ ग्रंथालयांना अनुदान मंजूर करण्यात आलेले नाही. तसेच त्रुटी आढळून आलेल्या १२३ ग्रंथालयाकडून खुलासा मागविण्यात आलेला असून सदर ग्रंथालयांना सन २०१५-२०१६ मध्ये देय परिक्षण अनूदानाचा हप्ता अद्याप वितरीत करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील उच्च माध्यमिक शाळा कनिष्ठ महाविद्यालय, विभाग तुकड्या, वर्ग यांचे मुल्यांकन कामकाज पूर्ण करुन अनुदान पात्र शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत**

**(१३) ३३८१८ (२०-०१-२०१६). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च माध्यमिक शाळा कनिष्ठ महाविद्यालय, विभाग तुकड्या, वर्ग यांचे मुल्यांकन कामकाज पूर्ण करुन अनुदान पात्र शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाची यादी जाहिर करावी व अनुदानाची तरतूद करावी या मागणीबाबतचे निवेदन विना अनुदानित उच्च माध्यमिक शाळा कृति समिती यांनी मा.मुख्यमंत्री, मा.शिक्षण मंत्री यांना दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०७-२०१६) :** (१) व (२) उच्च माध्यमिक शाळांच्या मुल्यांकनाच्या प्रस्तावांची आयुक्त (शिक्षण) यांचे स्तरावर तपासणी/छाननीची कार्यवाही सूरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीरामपूर (जि.अहमदनगर) येथील हिंद सेवा मंडळाच्या के.जे.सोमेय्या हायस्कुलमध्ये शालेय पोषण अहाराची झालेली चोरी**

**(१४) ३४४७५ (२१-०१-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) येथील हिंद सेवा मंडळाच्या के.जे.सोमय्या हायस्कुलमध्ये शालेय पोषण आहाराची चोरी झाल्याचे माहे ऑगस्ट २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आले, आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, तद्नुसार सदर शालेय पोषण आहार प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शालेय पोषण आहार योजनेंतर्गत प्रत्येक शाळेस स्वयंपाकघर, गॅस शेगडी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१५) ३४८८६ (२१-०१-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणारी खिचडी महिला बचत गटाकडून घेण्याऐवजी ती शाळेतच शिजविण्याकरिता शिक्षणसंस्थांना घरगुती दरात गॅस उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने माहे ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शाळांमध्ये स्वयंपाकगृह नाही त्याप्रत्येक शाळेस स्वयंपाकघर, गॅस शेगडी इत्यादीबाबत व्यवस्था करण्यात आली आहे काय, तसेच या शाळांना गॅस केव्हापर्यंत गॅस जोडणी करुन देण्यात येणार आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०७-२०१६) :** (१) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत सर्व शाळांमध्ये गॅसचा वापर करुन आहार शिजविला जाईल, याबाबत कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

(२) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पात्र शाळांकरिता स्वयंपाकगृहे मंजूर करण्यात आली असून ५७२९१ स्वयंपाकगृह बांधकामे पूर्ण झाली आहेत. शाळांना गॅस कनेक्शन उपलब्ध करुन देण्याबाबत विचाराविनिमय सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### शैक्षणिक वर्ष सुरु होऊन ही कोल्हापूर जिल्हयातील काही शाळांतील विद्‌यार्थ्यांना गणवेश मिळाला नसल्याबाबत

**(१६) ३५२५५ (२१-०१-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शैक्षणिक वर्ष सुरु होऊन ऑक्टोबर महिना संपत आला तरीही कोल्हापूर जिल्हयातील काही शाळांतील विद्‌यार्थ्यांना गणवेश मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठेकेदारांना शिलाईचे पैसे देऊनही गणवेश दिले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२०-०७-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कोल्हापूरातील कसबा बावडा रोड, मध्यवर्ती इमारतीतील उपसंचालक, क्रीडा युवक सेवा कोल्हापूर विभाग कार्यालयाच्या कामकाजाबाबत

**(१७) ३८५६७ (२०-०१-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरातील कसबा बावडा रोड, मध्यवर्ती इमारतीतील उपसंचालक, क्रीडा युवक सेवा कोल्हापूर विभाग कार्यालयाचा कारभार पुण्यातील क्रिडा व युवक सेवा संचालनालयाचे उपसंचालक प्रभारी म्हणून गत दीड वर्षापासून पाहत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या कार्यालयातील पाच लिपिकांची पदेही रिक्त असल्याने जिल्हयातील क्रिडा संकुले, तालुका क्रिडा संकुलाचा कामकाजाचा आढावा घेणे ही कामे नियोजित वेळेत होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कार्यालयातील लिपिकांची रिक्त पदे व कायमस्वरुपी उपसंचालक यांची नियुक्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०९-२०१६) :** (१), (२) व (३) विभागीय उपसंचालक कार्यालय कोल्हापूर येथील लिपिकांची पदे रिक्त नाहीत. तथापि उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, कोल्हापूर हे पद सद्य:स्थितीत रिक्त आहे. सदर पद भरण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये प्राचार्य आणि इतर अध्यापकांच्या वेतनावर अधिक खर्च करीत असल्याबाबत**

**(१८) ४१०५१ (०५-०५-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शुल्कापोटी राज्य शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानावर सुरु असलेली खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये प्राचार्य आणि इतर अध्यापकांच्या वेतनावर अधिक खर्च करीत असल्याची गंभीर बाब माहे डिसेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खारघरच्या जवाहर एज्युकेशन सोसायटीच्या प्राचार्यांचा दरमहा पगार हा ४ लाख रुपये आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यापीठ अनुदान आयोग आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या नियमित वेतनश्रेणी नियमांचे उल्लंघन केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, सदर महाविद्यालयांच्या आर्थिक व्यवहाराची व सर्व योजनेच्या अंतर्गत घेतलेल्या अनुदानाची चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत दोषी आढळुन आलेल्या महाविद्यालयांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हेखरे नाही.
प्रश्नाधिन संस्थेच्या प्रचार्यांना प्राचार्य पदापोटी तसेच त्यांच्यावर सोपविलेल्या संस्थेच्या व महाविद्यालयाच्या अतिरिक्त कामाच्या व्यापानुसार वेतन देण्यात येते.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्हयातील निवृत्त झालेल्या प्राथमिक शिक्षकांना वेतन फरक देण्याबाबत**

**(१९) ४१५५० (२५-०५-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयात माहे जानेवारी, २००६ ते फेब्रुवारी, २००९ या कालावधीत निवृत्त झालेले

प्राथमिक शिक्षक वेतन फरकापासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित शिक्षकांना वेतन फरक देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने काही अभ्यासक्रमांच्या प्रवेश शुल्कात केलेली दुपटीने वाढ**

**(२०) ४२४७५ (०५-०५-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने काही अभ्यासक्रमांच्या प्रवेश शुल्कात दुपटीने वाढ केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भीषण दुष्काळामुळे प्रवेश शुल्काअभावी अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे. परंतु काही अभ्यासक्रमाचा शुल्कामध्ये दुपटीने केलेली वाढ परिपत्रक क्र. अभ्यासक्रम.विभाग/का.वि.महा.वार्षिक शुल्क/ अध्यादेश-०१/८६/१५-१६/१५०४२-१५४४१, दिनांक २०/०१/२०१६ अन्वये रद्द करुन पूर्वीप्रमाणेच वार्षिक पध्दतीनेच असल्याबाबत सर्व संबंधितांना परिपत्रीत केले आहे व सदर परिपत्रकास दि. २३/०२/२०१६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेली आहे.
(२) वाढीव शुल्क रद्द केल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित होण्याचा प्रश्नच येत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयाच्या मंजूरीबाबत

**(२१) ४३२९२ (०३-०५-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय लवकरात लवकर उभे केले जाईल अशी घोषणा मा. पालकमंत्री, सातारा यांनी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वैद्यकीय महाविद्यालयास शासनाने एकूण किती निधी मंजूर केला आहे व यापैकी किती निधी अद्यापपर्यंत खर्च करण्यात आला आहे,

(३) असल्यास, उक्त महाविद्यालयाच्या कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०५-०८-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) सदर वैद्यकीय महाविद्यायाकरीता आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये रु.५.०० कोटी एवढा नियतव्यय मंजुर करण्यात आला होता. आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये २५ लक्ष एवढा नियतव्यय उपलब्ध आहे. तथापि जागा उपलब्ध नसल्याने सदर निधी आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पीत करण्यात आलेला नाही.

---

## मुंबई विद्यापीठाकडे बनावट पदव्यांची १३६ प्रकरणांची झालेली नोंद

**(२२) ४३३०६ (०५-०५-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बनावट पदवीच्या सहाय्याने राजकीय लाभ वा नोकरीत बढती मिळवून घेण्याचे प्रकार वाढत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-१६ या चालु शैक्षणिक वर्षाच्या अवघ्या ४ महिन्यातच मुंबई विद्यापीठाकडे बनावट पदव्यांची १३६ प्रकरणांची नोंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :** (१) बनावट पदव्यांच्या सहाय्याने राजकीय लाभ व बढती मिळवून घेण्याचे प्रकार वाढत असल्याबाबतची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही.
(२) हे अंशत: खरे आहे. सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाच्या अवघ्या ४ महिन्यात कार्यालयीन दस्तऐवजांशी पडताळणी केली असता १०६ बनावट गुणपत्रिका व प्रमाणपत्रिका निदर्शनास आल्या आहेत.
(३) विद्यापीठाकडे संबंधित प्रकरणाची नोद झाल्यानंतर तपास कामी पोलीसांना विनंती केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देशातील सर्व बीपीएडचा अभ्यासक्रम दोन वर्षाचा केल्याने महाविद्यालये विद्यार्थ्यांअभावी बंद पडण्याच्या मार्गावर असल्याबाबत**

**(२३) ४५२९६ (०५-०५-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशातील सर्व बीपीएडचा अभ्यासक्रम दोन वर्षाचा केल्याने ही महाविद्यालये विद्यार्थ्यांअभावी बंद पडण्याच्या मार्गावर आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे राज्यातील अनेक शिक्षक, कर्मचारी बेरोजगार होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शिक्षक व कर्मचाऱ्यांना अन्यत्र सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) केंद्र शासनाच्या National Council for Teacher Education (Recognition, Norms and Procedure) Regulations, २०१४ मधील सुधारीत निकषांनुसार शिक्षकीय व शिक्षकेतर पदांच्या आकृतिबंधामध्ये झालेल्या बदलानुसार अनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील अतिरिक्त ठरणाऱ्या अध्यापकांच्या समायोजनाची कार्यवाही शासनस्तरावरुन सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील केंद्रीय लोकसेवा परीक्षार्थीच्या विशेष शिष्यवृत्ती योजनेबाबत**

**(२४) ४५६८० (१७-०५-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये राज्यातील तरुणांना जास्तीत जास्त स्थान

मिळावे म्हणून शासनाने दिनांक १२ जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास विशेष शिष्यवृत्ती देण्याची घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा फायदा राज्यातील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला बसणाऱ्या कोणकोणत्या परीक्षार्थींना होणार आहे,

(३) तसेच सदर योजनेतील लाभार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सर्वच प्रशिक्षण संस्था दिल्लीस्थित असून उक्त दिल्लीस्थित संस्था निवडीचे निकष कोणते आहेत,

(४) तसेच सदर योजनेची अंमलबजावणी केव्हापासून सुरु होणार आहे ?

**श्री. विनोद तावडे (०२-०९-२०१६) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) मागील तीन वर्षात किमान एकवेळा केंद्रीय लोकसेवा .आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखत फेरीपर्यंत पोहचणाऱ्या, तथापि, अंतिमत: भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये निवड न होणाऱ्या व कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न रु.१०.०० लाखापेक्षा कमी असणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील होतकरु व गुणवान उमेदवारांना पूर्व, मुख्य व मुलाखत परीक्षेच्या कालावधीसाठी वा यापैकी कोणत्याही टप्प्यासाठी सदर योजनेचा लाभ मिळणार आहे. यासंदर्भातील शासन निर्णय दिनांक १६.४.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(३) याकरिता राज्य शासनास शिफारस करण्याकरिता दिनांक १६.४.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यकारी समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) या योजनेची अंमलबजावणी सन २०१६-१७ पासून होणार आहे.

---

## नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या गैरव्यहाराबाबत

**(२५) ४६१५० (०५-०५-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर या विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्राच्या परीक्षा दिनांक २८ जानेवारी, २०१६ पासून होणार होत्या परंतू सदर परिक्षा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यापीठाअंतर्गत एमएससी चतुर्थ सत्राच्या उन्हाळी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये परिक्षा दिली असतांनाही निकाल जाहीर झाल्यावर त्यामध्ये परिक्षेला उपस्थित अनेक विद्यार्थ्यांना गैरहजर दाखविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विद्यार्थ्यांची गैरसौय टाळण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही. सदर परीक्षा दिनांक ८ मार्च, २०१६ ते १४ मार्च, २०१६ या कालावधीत संपन्न झाल्या.
(२) होय, हे खरे आहे. तथापि, त्वरीत निकाल दुरुस्त करुन सुधारित करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा सामान्य रुग्णालयातील पात्र तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांना वैद्यकीय महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक पदाचा कार्यभार देण्यासंदर्भात**

**(२६) ४६४२४ (०३-०५-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये शैक्षणिक कामकाजासाठी कंत्राटी पध्दतीने नविन प्राध्यापकांची नियुक्ती न करता जिल्हा सामान्य रुग्णालयातील तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांकडेच सोपविण्यात आलेल्या चिकित्सालयीन कामकाजाबरोबर सहाय्यक प्राध्यापक पदाचा कार्यभार सोपविण्यात यावा असे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी, चंद्रपूर यांनी मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री महोदयांना दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, शैक्षणिक व चिकित्सालयीन कामकाजासाठी दोन वेगवेगळया व्यक्तींच्या नियुक्तीमुळे शासनाचे दरवर्षी कोटयवधी रुपयांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हा सामान्य रुग्णालयातील पात्र तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांना वैद्यकीय महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक पदाचा कार्यभार देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०९-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही.
(४) कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शिक्षक मद्यपान करुन शाळेमध्ये येत असल्याबद्दल**

**(२७) ४७०५६ (१२-०५-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही भागांतील शाळांमध्ये शिक्षक कामावर येतानाच वा वर्गात अध्यापन करतांना नशापान करून येतात अशी तक्रार ओरिएटंल ह्यूमन राईट्स प्रोटेक्शन फोरम ठाणे या संस्थेने पहाणी अहवाल करून शासनाकडे सादर केला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालाची गंभीर दखल घेऊन त्यातील शिफारशींच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०९-२०१६) :** (१) सदर संस्थेचे दि. १८/१२/२०१५ चे निवेदन जानेवारी, २०१६ मध्ये शासनास प्राप्त झाले आहे.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित प्राधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात (एनएसएसच्या) राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना बंधारा बांधण्याची करण्यात येत असलेली सक्ती**

**(२८) ४७६१८ (१२-०५-२०१६). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात (एनएसएसच्या) विद्यार्थ्यांना बंधारा बांधण्याची सक्ती करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि. ठाणे) तालुक्यात क्रीडा संकुल बांधण्याबाबत

**(२९) ४७८२२ (०६-०५-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक तालुक्यात क्रीडा संकुल बांधण्याचा निर्णय नुकताच शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर तालुक्यात क्रीडा संकुल बांधण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी माहे एप्रिल, २०१५ च्या सुमारास पहाणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्रीडा संकुलनासाठी कोणती जागा निश्चित केली आहे, सदर क्रीडा संकुलन कधी पूर्ण होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) जिल्हाधिकारी, ठाणे यांनी तालुका क्रीडा संकुल जागे संदर्भात जानेवारी, २०१६ मध्ये बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांनी खर्डी येथीन ग्रामीण रग्णालयासमोर असलेल्या एकून शासकीय जागेपैकी ७ ते ८ एकर जागा शहापूर तालूका क्रीडा संकुलासाठी देण्याची तत्वत: मान्यता देऊन तसा प्रस्ताव तहसिलदार, शहापूर यांना सादर करणेबाबत सूचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे क्षेत्रीय कार्यालयाकडून तहसिलदार, शहापूर यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## भिवंडी शहर व ग्रामीण भागासाठी शासकीय कला व वाणिज्य महाविद्यालयास मंजूरी मिळण्याबाबत

**(३०) ४८०२० (२५-०५-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहर व ग्रामीण भागासाठी शासकीय कला व वाणिज्य महाविद्यालयास मंजूरी मिळण्याबाबत तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी-भिवंडी पूर्व यांनी मा.उच्च, तंत्र व वैद्यकीय शिक्षण मंत्री व राज्यमंत्री-उच्च व तंत्र शिक्षण यांना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरात कोणतेही शासकीय कला, वणिज्य व वैद्यकीय महाविद्यालय नसल्याकारणाने तेथील गरीब, गरजू व सर्वसामान्य विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी भिवंडीबरोबर इतरत्र जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०८-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. तथापि भिवंडी शहर व ग्रामीण भागामध्ये शासकीय कला व वाणिज्य महाविद्यालय नसले तरी अशासकीय अनुदानित-३ व अशासकीय कायम अनुदानित-८ असे एकूण-११ महाविद्यालय कार्यरत आहेत.

भिवंडी शहर व ग्रामीण भागामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधिन नाही. तथपि, खाजगी संस्थेने वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केल्यास व आवश्यक त्या निकषांचीपुर्तता करीत असल्यास आवश्यक ते प्रमाणपत्र देण्यासंदर्भात शासन स्तरावरुन निर्णय घेण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अभियांत्रिकी व पदविका महाविद्यालये दुसरे सत्र चालवीत असल्याचे दाखवून एकाच सत्रात महाविद्यालयानी केलेला गैरव्यवहार

**(३१) ४८८५८ (२६-०५-२०१६). श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अभियांत्रिकी व पदविका महाविद्यालये दुसरे सत्र चालवीत असल्याचे दाखवून एकाच सत्रात महाविद्यालयाचा कारभार करुन कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार होत असल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत पाच वर्षात किमान दीड लाख विद्यार्थ्यांच्या नावे दोन हजार रुपयांप्रमाणे प्रशासकीय व्यवस्थेच्या नावाखाली संबंधित महाविद्यालयांनी पैसे उकळले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने चौकशीचे आदेश दिले असून या गैरव्यवहारा प्रकरणी मोक्का अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली जात आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार याप्रकरणात दोषी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :** (१) सदर बाबीची बातमी दिनांक ३/२/२०१६ रोजीचे लोकसत्ता वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झाली होती.तसेच या संदर्भातील निवेदन तंत्रशिक्षण संचालनालयास प्राप्त झाले आहे.

(२) राज्यातील व्यावसायिक पदवी, पदविका अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क हे निश्चित करण्यात येते. त्यानुसार संस्थास्तरावरुन शिक्षण शुल्क समितीने निर्धारित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येते.

(३) या प्रकरणी कार्यवाही करण्याची मागणी सदर निवेदनात केली आहे.

(४) या संदर्भात चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### औरंगाबाद येथील संभाजी नगरातील रत्नपुर येथे अलिगड मुस्लीम विदयापिठाचे केंद्र उभारण्याचा प्रस्तावाबाबत

**(३२) ४८९८० (२६-०५-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील संभाजी नगरातील रत्नपुर येथे अलिगड मुस्लीम विदयापिठाचे केंद्र उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर विचाराधीन प्रस्तावावर शासनाचा निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास,त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०९-२०१६) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात उच्च अर्हता मिळविणाऱ्या नियमित शिक्षकांना त्यांच्या नव्या अर्हतेनुसार नियुक्ती देतांना नियमित शिक्षक म्हणून नियुक्ती देण्याबाबत

**(३३) ४९११६ (१६-०५-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उच्च अर्हता मिळविणाऱ्या नियमित शिक्षकांना त्यांच्या नव्या अर्हतेनुसार नियुक्ती देतांना शिक्षण सेवक म्हणून न देता नियमित शिक्षक म्हणून नियुक्ती द्यावी असा महत्वपूर्ण निर्णय राज्याचे शालेय शिक्षण मंत्री यांनी माहे सप्टेंबर, २०११ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याच अनुषंगाने माध्यमिक विभागातून उच्च माध्यमिक विभागात नियमित शिक्षक म्हणून नियुक्ती मिळणाऱ्या शिक्षकांच्या वेतनास संरक्षण देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावावर केव्हापर्यंत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०९-२०१६) :** (१) होय.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना शहरातील जिल्हा क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीबाबत

**(३४) ४९१२० (०६-०५-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने सन १९९५ मध्ये राज्याचे क्रीडा धोरण जाहिर केले असून त्याची अंमलबजावणी सन १९९७ मध्ये सुरु झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जालना जिल्हा क्रीडा संकुलाची उभारणी ही सन २००० ते २००१ या काळात झाली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या संकुलात खेळाडूंसाठी अत्याधुनिक सोयी-सुविधा त्यावेळी पुरविण्यात आल्या होत्या मात्र सद्यस्थितीमध्ये क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीअभावी येथील मैदानाची अत्यंत दुरावस्था झालेली असून प्रेक्षक गॅलरीचे लोखंडी साहित्य गायब व पाण्याविना शौचालय अशी स्थिती आहे, तसेच येथील इतर सोयी सुविधांचीही दुरावस्था झाली असल्याचे माहे जानेवारी २०१६ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, क्रीडा संकुलाच्या डागडुजी व दुरुस्तीबाबत ८ कोटी रुपये निधी मागणीचा प्रस्ताव जालना जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी संचालनालयाकडे पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रस्तावास मंजूरी देऊन निधीची तरतूद करण्यात आली आहे काय, तसेच जिल्हा क्रीडा संकुलाची तातडीने दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (१२-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे. सन २०१३-१४ मध्ये झालेल्या वादळी वारा व पावसाने जिल्हा क्रिडा संकुलातील एका प्रेक्षक गॅलरीचे नुकसान झाले आहे. तथापि बांधकामासाठी प्राप्त अनुदानातुन दुरुस्तीचे कामे हाती घेत येत नसल्याने तसेच प्रेक्षक गॅरलीच्या पुर्नउभारणीसाठी सुमारे रु. ३०

ते ३५ लक्ष खर्च अपेक्षित असल्याने दुरुस्तीचे काम जिल्हा क्रिडा संकुल समितीला हाती घेता आले नाही. त्यामुळे गॅलरीच्या लोखंडी कैच्या व लोखंडी कॉलम काढून सुरक्षित ठेवण्यात आलेले आहेत. तसेच दैनदिन काळात व स्पर्धा काळात खेळाडूंना प्रसाधन गृह पाणी सुविधेसह वापरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येते.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाच्या विविध अनुदान वाटपात अनियमितता आणि गैरव्यवहाराच्या तक्रारीमुळे लातूरच्या क्रीडा अधिकारी कार्यालयाची चौकशी सुरु असल्याबाबत**

**(३५) ४९५३७ (०६-०५-२०१६). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या विविध अनुदान वाटपात अनियमितता व गैरव्यवहाराच्या तक्रारीमुळे लातूरच्या क्रीडा अधिकारी कार्यालयाची चौकशी जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरील चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(३) सदरील चौकशी अहवाल प्राप्त होऊनही संबंधित दोषीवर अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०९-२०१६) :** (१), (२), (३) व (४) होय. जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, लातूर येथे जिल्हा नियोजन समिती, लातूर यांच्याकडून प्राप्त निधी वितरण प्रस्तावाच्या मंजूरी व अनुदान वाटपामध्ये वित्तीय अनियमितता झाल्याचे जिल्हाधिकारी, लातुर यांच्या चौकशी अहवालामध्ये नमूद आहे. सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरिता उपसंचालक (मुख्यालय), क्रीडा व युवकसेवा, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर येथील संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांना संचालनालयामार्फत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्रातील अभियांत्रिकी अथवा तंत्रशिक्षण महाविद्यालयांनी खोटी माहिती देऊन एआयसीटीईची फसवणूक केल्याबाबत**

**(३६) ५०३५५ (२६-०५-२०१६). श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), प्रा.वर्षा गायकवाड**

**(धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात अभियांत्रिकी अथवा तंत्रशिक्षण महाविद्यालये सुरु करताना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या निकषांचे पालन करणे बंधनकारक असताना स्वयंस्पष्ट व प्रतिज्ञापत्राद्वारे माहिती देण्याच्या प्रक्रियेचा फायदा घेत राज्यातील बहुतेक महाविद्यालयांनी खोटी माहिती देऊन एआयसीटीईची फसवणूक केल्याची माहिती राज्याच्या तंत्रशिक्षण संचालनालयाने केलेल्या चौकशीत माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू चौकशीनुसार राज्यातील किती अभियांत्रिकी अथवा तंत्रशिक्षण महाविद्यालयांचा यात समावेश आहे,

(३) असल्यास, चुकीची माहिती देऊन फसवणूक केल्याप्रकरणी सदरहू महाविद्यालयांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०८-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये राज्यातील सर्व विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांची अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने निर्धारित केलेल्या मानकांनुसार पायाभूत सोयी इ.ची तपासणी तंत्रा शिक्षण संचालनालयामार्फत करण्यात आली असून त्यांतील काही महाविद्यालयांमध्ये पायाभून सोयी सुविधा, अध्यापक इ. बाबत त्रृटी आढळून आल्या आहेत.

(२) राज्यातील एकूण ३४६ अभियांत्रिकी महाविद्यालयांचा यात समावेश आहे.

(३) विहीत मानकांची पूर्तता न करणाऱ्या महाविद्यालयांचा तपासणी अहवाल तंत्र शिक्षण संचालनालयाकडून अखिल भारतीय तंत्राशिक्षण परिषद, नवी दिल्ली, संबंधित विद्यापीठे यांना उचित कारवाईसाठी पाठविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील नविन ग्रंथालयांना मान्यता देण्याबाबत**

**(३७) ५१२६७ (२६-०५-२०१६). श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नविन ग्रंथालयांना मान्यता देण्यात येऊ नये याबाबत दिनांक ७ जून, २०१४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णयामुळे राज्यातील खेड्यापाड्यातील सामान्य जनतेला दैनंदिन घडणाऱ्या राजकीय, आर्थिक, कृषी, शैक्षणिक, इ. माहितीपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सामान्य जनतेला माहिती, ज्ञान मिळणाच्या दृष्टीने सार्वजनिक ग्रंथालय असणे अत्यावश्यक असल्यामुळे नविन ग्रंथालयांना मान्यता देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याविषयीचे निवेदन मा.मुख्यमंत्री महोदयांना नाशिक लोकप्रतिनिधींनी दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-०९-२०१६) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत राज्यातील ४३ शासकीय ग्रंथालये व १२,१४४ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या माध्यमातून राज्यातील वाचकांना विविध ग्रंथालयीन सेवांचा लाभ देण्यात येत आहे.

(३) व (४) सध्या अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक ग्रंथालयांची गुणवत्ता तपासल्यानंतर नवीन गंथालयांना मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी विधानसभा मतदारसंघात (जि.बीड) खाशाबा जाधव**
**कुस्ती स्पर्धा आयोजित करण्याबाबत**

**(३८) ५१४३२ (०६-०५-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी विधानसभा मतदारसंघात (जि.बीड) सन २०१६-१७ मध्ये खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धा आयोजित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी क्रीडा विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धा आष्टी विधानसभा मतदारसंघात आयोजित करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, सदरहू स्पर्धेचे आयोजन न करण्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०९-२०१६) :** (१) होय.
(२) स्व.खाशाबा जाधव चषक कुस्ती स्पर्धेच्या दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१२ च्या नियमावली नुसार सदर स्पर्धेचे सर्वसाधारण धोरण व संनियंत्रण करणे, स्पर्धेचे ठिकाण ठरवणे आणि स्पर्धेसाठी आर्थिक तरतूद करुन देण्याच्या दृष्टीने मा.मंत्री (क्रिडा व युवक कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरात शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याबाबत**

**(३९) ५१६४२ (०१-०६-२०१६). श्री.प्रकाश अबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरात शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय होण्याकरिता उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना निवेदन देण्यात आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूरात स्वायत्त सहा पदविका अभ्यासक्रम असलेले शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय चालविण्याचे सरकारच्या विचाराधीन होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०८-२०१६) :** (१) सदर निवेदन विभागात आढळून येत नाही.
(२) व (३) कोल्हापूर जिल्हयात एकमेव शासकीय तंत्रनिकेतन असून त्यास चांगला प्रतिसाद असल्याने व त्या तुलनेत राज्यातील अभियांत्रिकी पदवी महाविद्यालयांतील प्रतिवर्षी मोठयाप्रमाणावर रिक्त राहणाऱ्या जागा लक्षाला घेता कोल्हयापूरमध्ये नव्याने अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्याचे प्रस्तावित नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयात आयुर्वेद प्रकल्पाची मान्यता विदर्भ वैद्यानिक विकास महामंडळाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(४०) ५१६६२ (३०-०४-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयात ५०० हेक्टर जमिनीवर आयुर्वेद प्रकल्प उभारण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या आठवडयात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पाची मान्यता विदर्भ वैद्यानिक विकास महामंडळाकडे प्रलंबित असून या प्रकल्पामुळे जिल्हयातील अदिवासींना रोजगार मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पास मान्यता देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०८-२०१६) :** (१) होय. याबाबत दि. २२/०९/२०१५ रोजीच्या वृत्तपत्रांमध्ये बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) होय.

(३) व (४) सदर प्रकल्प विभागीय आयुक्त, नागपूर आणि विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर यांचेकडे सादर केलेला असून पुढील पत्रव्यवहार अधिष्ठाता,शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,नागपूर यांचे स्तरावर सुरु आहे.

---

**कोल्हापूर जिल्हयातील ग्रंथालयाला दीडपट अनुदान वाढवूनही ग्रंथलयांना अनुदान अद्याप पर्यंत मिळाले नसल्याबाबत**

**(४१) ५१६७१ (२६-०५-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश अबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात एकूण ६८५ सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत असून त्यांना राज्य शासनाच्या ग्रंथालय संचालनालयाच्या माध्यमातून वर्षाला माहे सप्टेंबर व मार्च या दोन टप्प्यांत अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत वर्षी (म्हणजेच सन २०१४) पासून शासनाने ग्रंथालयाचे अनुदान दीडपट वाढवून ग्रंथालयांना दिलासा दिला मात्र अदयापही अनुदान मिळण्याच्या प्रतिक्षेत ग्रंथालये आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रंथालयांना अनुदान मिळण्याकरीता विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच उक्त अनुदान देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-०९-२०१६) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.मराग्रं २०१२/प्र.क्र.२५३/२०१३/साशि-५, दि.०७ जून, २०१४ नुसार फेरतपासणीमध्ये कार्यरत असलेल्या राज्यातील ५७०१ ग्रंथालयांपैकी कोल्हापूर जिल्हयातील ३५६ ग्रंथालयांना वाढीव तदर्थ अनुदान माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये अदा करण्यात आहे.

(३) व (४) सन २०१५-१६ मध्ये शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या परिरक्षण अनुदानासाठी रु. ६२२७.५४ लक्ष रकमेची पुरवणी मागणी मंजूर करण्यात आली.

सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मधील नियमित परिरक्षण अनुदान अदा करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई व मुंबई परिसरातील मराठी ग्रंथ संग्रहालय नामशेष होण्याच्या मार्गावर**

**(४२) ५१८७६ (०६-०५-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व मुंबई परिसरातील "मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या" ४४ शाखा आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त संस्थेंतील कामकाजांमध्ये होत असलेला गैरव्यवहारामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरली असून यामुळे सदर मराठी ग्रंथ संग्रहालय नामशेष होण्याच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुषंगाने सदर मराठी ग्रंथ संग्रहालय नामशेष होऊ नये यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप याबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०२-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.
मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या ४४ शाखापैकी दादर (पुर्व), दादर (पश्चिम), काळाचौकी, मुलूंड (पुर्व), गोरेगांव (पुर्व), घाटकोपर (पुर्व) येथील सहा ग्रंथालये शासनमान्यता प्राप्त आहेत.
(२) व (३) हे खरे नाही
शासनमान्यता प्राप्त वरील सहा ग्रंथालयाची चौकशी केली असता चौकशीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथील मनोरूग्ण विभाग बंद असल्याबाबत**

**(४३) ५२१६६ (०३-०५-२०१६). श्री.संजय शिरसाट (औरंगाबाद पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथील मनोरूग्ण विभाग हा गत वर्षापासून बंद असल्यामुळे मोठ्या प्रमाणात दुरवरून येणा-या रूग्णांना त्रास सहन करावा लागतो याबाबत स्थानिक वृत्तपत्रातून बातम्या प्रसिध्द होऊनही अद्यापपर्यंत हा विभाग कार्यान्वीत झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) सिल्लोड (जि.औरंगाबाद) येथील २० वर्ष डांबुन ठेवलेल्या रूग्णास हा विभाग बंद असल्यामुळे औषध विभागमध्ये ठेवण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मनोरूग्ण विभाग सुरू करण्याबाबत वैद्यकीय शिक्षण विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच मनोरूग्ण विभाग बंद असण्यास संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०७-२०१६) :** (१) नाही.
(२) नाही.

सदर रुग्णास स्किझोफ्रेनीया या शारीरिक व्याधीच्या उपचारासाठी औषधवैद्यक शास्त्र विभागामध्ये दाखल करण्यात आले होते. तसेच त्यांच्या मानसिक आजारावरही सदर विभागातच मनोविकृतीशास्त्र विभागामार्फत उपचार करण्यात आले होते.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथे यशवंतराव चव्हाण विद्यापीठाने सुरु केलेली घरपोच पुस्तके देण्याची योजना अपयशी ठरल्याबाबत**

**(४४) ५२४८२ (२६-०५-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथे यशवंतराव चव्हाण विद्यापीठाने सुरु केलेली घरपोच पुस्तके देण्याची योजना अयशस्वी ठरली असल्याने लाखो विद्यार्थ्यांना पुस्तके मिळालेली नसून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष धोक्यात आले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन सदर विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना त्वरीत पुस्तके मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०९-२०१६) :** (१) नाही. दि. ०१ जून ते ३० ऑक्टोबर, २०१५ पर्यंत विविध शिक्षणक्रमांना प्रवेश घेतलेल्या एकूण ६,७६,८३१ विद्यार्थ्यांना ऑगस्ट, २०१५ ते डिसेंबर, २०१५ पर्यंत खालीलप्रमाणे पुस्तके पाठविण्यात आलीआहेत

(१) भारतीय डाक सेवेमार्फत एकूण ४,३२,९४०
(२) अंकल पार्सल सेवेमार्फत एकूण २,२३,४६५
(३) विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या अभ्यासकेंद्रावर विद्यापीठामार्फत एकूण २०,४२६

तथापि, वरील विद्यार्थ्यांना पाठविलेल्या पुस्तकांपैकी १४,८३५ विद्यार्थ्यांचे पत्ते अपूर्ण किंवा चुकीचे असल्याने सदरील पुस्तके विद्यापीठाकडे परत आली होती. त्यानंतर २१,६५३ विद्यार्थ्यांनी पत्ते बदलले व १८,७४० विद्यार्थ्यांची फी विद्यापीठाच्या वित्त विभागात उशिरा

जमा झाल्याने त्यांचे प्रवेश उशिरा निश्चित झाले. अशा एकूण ५५,२२८ विद्यार्थ्यांची पुस्तके विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या अभ्यासकेंद्रावर पाठविण्यात आली. त्यामुळे जानेवारी, २०१६ च्या दरम्यान सदरील विद्यार्थ्यांना अभ्यासकेंद्राकडून पुस्तके ध्यावी लागल्यामुळे ती उशिरा मिळाली आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांनी करार पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(४५) ५२६२७ (२६-०५-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांनी सन २००८ मध्ये करार पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना विद्यापीठांच्या सेवेत सामावून घेण्याबाबत दिनांक ९ फेब्रुवारी, २०१३ च्या पत्रान्वये शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावानुसार शासन आदेश क्र.वायएमयु/२०१३/(४७/१३) विशि-१२ दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४ रोजी च्या आदेशानुसार पदे निर्माण करुन व दिनांक २५ फेब्रुवारी २०१४ च्यापत्रान्वये १७ उमेदवारांना विद्यापीठाच्या सेवेत सामावून घेण्यास मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांनी दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी कुलसचिवांना प्रक्रिया करण्याची कार्यवाही करण्यात यावी असे पत्र दिले होते, हे ही खरे अहे काय,

(३) असल्यास, सदरचे पत्र देऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त उमेदवारांना सेवेत सामावून घेण्यास कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०८-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर पत्रास अनुसरुन या उमेदवारांना सेवेत समावून घेण्यात विविध अडचणी असल्याचे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने दिनांक ०३/०२/२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच या कर्मचाऱ्यांना विद्यापीठाच्या नियमित सेवेत समाविष्ट करण्याबाबत विचार करण्यासाठी उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती यांचा सल्ला घ्यावा व माजी न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ आस्थापनेवर यापूर्वी भरलेली पदे व त्यांच्या नेमणूका याबाबत सत्यशोधन समिती गठित करण्याचा ठराव व्यवस्थापन मंडळाच्या सभेत झाल्याचे दिनांक १८/०५/२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे.याबाबत विद्यापीठ स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कायदा, १९८९ मधील कलम २९(१) नुसार अध्यापकांची, अधिकाऱ्यांची किंवा इतर कर्मचाऱ्यांची नवीन पदे निर्माण करण्याचे अधिकार शासनास आहेत. सदर पदांवर नियुक्ती करण्याचे अधिकार उक्त अधिनियमातील कलम ५(१६) नुसार विद्यापीठास आहेत. तसेच सदर अधिनियमातील कलम २१ (d) नुसार विद्यापीठ कर्मचारी यांच्या वेतन, अर्हता, वर्तणूक, सेवाशर्ती, सेवाविषयक बाबी यांचे नियमन करण्याची तरतूद याबाबतचे अधिकारही विद्यापीठास आहेत. पदनिर्मितीची कार्यवाही झालेली असल्याने शासन  स्तरावरुन पुढील कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रंथालय कर्मचाऱ्यांना ८० टक्के वेतन व २० टक्के पगारवाढ लागू करण्याबाबत**

**(४६) ५२६३७ (२६-०५-२०१६). श्री.प्रकाश अबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय ग्रंथालय अधिवेशन पुणे येथे राज्यातील ग्रंथालय कर्मचा-यांना वेतनश्रेणी सेवाशर्ती तात्काळ लागू कराव्यात ८० टक्के वेतन व २० टक्के वेतनेत्तर वाढ करण्यात यावी अशी मागणी पुणे विभागीय ग्रंथालय संचालक किरण धांडोरे यांच्याकडे दिनांक २५ फेब्रुवारी, २०१६ वा त्या सुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मार्च, २०१६ पूर्वी वाढीव अनुदान व अन्य सोई-सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नियुक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना डी.सी.पी.एस. या योजनेंतर्गत सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना लागु करण्याबाबत**

**(४७) ५३३१७ (२८-०४-२०१६). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यलयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना सेवानिवृत्ती व उपदान योजना शासन निर्णय दिनांक २१ जुलै, १९८३ च्या आदेशानुसार लाभ देण्यात यावेत असा निर्णय मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ नोव्हेंबर, २०१५ नंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना डी.सी.पी.एस. या योजनेंतर्गत सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना लागु करण्याकरिता वित्त विभागाची मंजुरी आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात लोप्रतिनिधी नाशिक यांनी दिनांक ५ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा. वित्त मंत्री यांना निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना डी.सी.पी.एस. या योजनेंतर्गत सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना लागु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०८-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) व (५) शासन निर्णय दि.१७.१.२०१५ अन्वये विदर्भातील ४ महाविद्यालयांना दिनांक २१.११.२०११ पासून सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना लागु करण्यात आली आहे. उर्वरीत अनुदानीत आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवानिवृती वेतन योजना लागु करण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय अद्याप घेतलेला नाही.

---

**केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना कार्यक्रम बंद करणेचा घेतलेला निर्णय**

**(४८) ५४३१३ (१०-०८-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने दिनांक २९ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास राज्य शासनाला पत्र पाठवून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना कार्यक्रम बंद करण्याबाबत कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील उक्त कार्यक्रमाखाली घेतलेल्या योजना माहे जुलै २०१५ पासून अपूर्ण स्थितीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर योजना पूर्ण करण्यास शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०९-२०१६) :** (१) केंद्र शासनाने दिनांक २९/०६/२०१५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत राज्यातील फ्लोराईड व आर्सेनिक बाधित गावे/वाड्यांसाठी कायमस्वरुपी व तात्पुरती उपाययोजना, संसद आदर्श ग्राम योजनेअंतर्गत समाविष्ट गावे/वाड्या व केवळ प्रगतीपथावरील पाणी पुरवठा योजना वगळता अन्य योजना घेण्यासाठी निधी वितरण बंद केले आहे.

(२) हे खरे नाही.
(३) राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाची स्वत:ची "मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना" दिनांक ०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार हाती घेण्यात आली आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत केंद्र शासनास सादर केलेल्या कृती आराखड्यामधील काही गावे/वाड्या/ वस्त्या यांचा समावेश "मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेमध्ये" करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मा.मराठी भाषा मंत्री, राज्य मराठी विकास संस्था आणि राज्य शासनाचे सर्व संबंधित यांची झालेली बैठक**

**(४९) ५५६५४ (२२-०८-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.मराठी भाषा मंत्री, राज्य मराठी विकास संस्था आणि राज्य शासनाचे सर्व संबंधित यांची दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली व त्यात काही महत्वाचे निर्णय घेण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आलेले आहेत,
(३) सदर निर्णयाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१२-०९-२०१६) :** (१) होय.
(२) सदर बैठकीत घेण्यात आलेले महत्वाचे निर्णय खालीलप्रमाणे आहेत.

(१) राज्य मराठी विकास संस्थेकडे दीर्घकाल कार्यान्वित असलेले प्रकल्प संस्थेने लवकरात लवकर पूर्ण करावेत.

(२) संस्थेने हाती घेतलेल्या (१) महाराष्ट्रातील मराठीच्या बोलींचे प्रतिमांकन, (२) तंत्रज्ञान संगणक आणि मराठी अंतर्गत मराठी प्रमाण लेखन यंत्रणा (मराठी स्पेलचेक), मराठी भाषा-लेखन आणि लेखन वाचन यंत्रणा (स्पीच टू टेक्स्ट आणि टेक्स्ट टू स्पीच), मराठीतील देवनागरी आणि मोडी लिपीसाठी ओसीआर (ऑप्टीकल कॅरॅक्टर रेकग्नीशन) व मुक्त स्त्रोत संगणकीय साधनांचे वितरण आणि प्रशिक्षण (३) अमराठी भाषकांसाठी अध्ययन-अध्यापन साधने विकसीत करणे (४) श्राव्य पुस्तके (५) विधी कोश (लेक्सीकाॅन) या ५ नवीन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली.

(३) संस्थेच्या घटनेतील तरतूदीनुसार संस्थेच्या कार्यकारी समिती, प्रकल्प समिती,वित्त समिती, पदनिर्मिती समिती, संचालक-उपसंचालक निवड समिती ,तसेच नव्याने स्थापन करण्यात येणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्या विरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारींचे निवारण करण्याच्या समित्यांवर अशासकीय सदस्यांच्या निवडीचे अधिकारी मा.मंत्री (मराठी भाषा) यांना देण्यात आले.

(४) राज्य मराठी विकास संस्थेकडून प्रकाशित करण्यात आलेल्या पुस्तकांची विक्री ५० ते ६० % सवलत देऊन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(५) संस्थेच्या प्रशासकीय व दैनंदिन कामकाजाशी निगडीत विषय कार्यकारी समितीच्या अखत्यारीतील असल्यामुळे अशा प्रस्तावास मंजूरी देण्याचे अधिकार कार्यकारी समितीस देण्यात आले.

(३) सदर निर्णयाच्या अनुषंगाने राज्य मराठी विकास संस्थेकडे कार्यवाही सुरु आहे.

---

## मराठी भाषेच्या विकासाठी धोरणात्मक मसुदा तयार करुन शासनास सादर करणेबाबत

**(५०) ५५९३१ (२२-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेच्या विकासाठी मराठी भाषा समितीची शासनाने सन २०१३ साली स्थापना केलेली असून या समितीने २५ वर्षाचा धोरणात्मक मसुदा तयार करुन शासनास सादर करावयाचा आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने २५ वर्षाच्या धोरणाचा मसुदा तयार केला आहे काय, असल्यास त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१६) :** (१) दि. २२ जून, २०१० च्या शासन निर्णयान्वये विभागांतर्गत कायमस्वरुपी भाषा सल्लागार समितीची स्थापना केली आहे. पुढील २५ वर्षातील मराठी भाषेचे धोरण ठरविण्यासाठी या समितीमार्फत सन २०१३ पासून कार्यवाही सुरु आहे.

(२) या समितीने पुढील २५ वर्षातील मराठी भाषा धोरणाचा मसुदा दि. १९/८/२०१४ रोजी शासनास सादर केला होता.

समितीने सादर केलेला मसुदा शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन त्यावर जाहीरपणे सर्वांकडून अभिप्राय मागविण्यात आले होते. या सूचना/अभिप्राय विचारात घेऊन धोरण अंतिम करण्याची कार्यवाही भाषा सल्लागार समितीमार्फत सुरु होती. दरम्यान भाषा सल्लागार समितीची दि. ५/८/२०१५ च्या शासन निर्णयान्वये पुनर्रचना करण्यात आली. पुनर्रचित समितीकडून धोरणाचा मसुदा अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.